# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

### सोमलवाडा (मनीष नगर) आरयुबीचा लोकार्पण समारंभ संपन्न

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली झाला लोकार्पण समारंभ




नागपूर : नागपूर शहरातील मनीषनगर येथील रेल्वे अंडर ब्रिजचे बांधकाम पूर्ण झाले असून, त्याचे लोकार्पण आज संपन्न झाले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते आणि केंद्रीय

मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली या रेल्वे अंडर ब्रिजचा उदघाटन सोहळा पार पडला. उदघाटनानंतर लगेचच हा मार्ग नागरिकांसाठी खुला करण्यात आला .

या प्रकल्पाची एकूण लागत ३३.८३ कोटी रुपये असून, आरयूबीची लांबी १९० मीटर, रुंदी ८ मीटर आणि उंची ४ मीटर आहे. आरयूबीचे निर्माण मुंबई-हावडा व दिल्ली-चेन्नई या निरंतर व्यस्त रेल्वे मार्गावर करण्यात आले आहे. या अंडर ब्रिजमध्ये पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र पादचारी मार्ग देखील उपलब्ध करण्यात आला आहे.

आरयूबीमुळे मनीषनगर परिसर आणि वर्धा मार्ग यांच्यात चांगली कनेक्टिव्हिटी होईल. याचा मोठा फायदा मनीषनगर, बेसा, घोगली आणि बेलतरोडी येथील लाखो नागरिकांना होईल. रेल्वे फाटकामुळे होणाऱ्या त्रासापासून मुक्ती मिळेल तसेच यामुळे या परिसरातील नागरिकांना वाहतूक कोंडीपासून मुक्ती मिळेल, तसेच मनीषनगर येथील रहिवाश्यांना वर्धा मार्गावर सहज प्रवेश मिळवता येईल.  क्रॉसिंगवर होणारा जामचा त्रास दूर होईल आणि त्यासोबतच प्रवासात वेळेचीही बचत होईल.

सोमलवाडा (मनीष नगर) आरयुबीचा लोकार्पण समारोह :

मा.ना. श्री.देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

मा.ना. श्री.नितीन गडकरी

केंद्रीय मंत्री, परिवहन,महामार्ग भारत सरकार

मा.ना .ॲड. आशिष जयस्वाल

राज्यमंत्री,वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार, महाराष्ट्र राज्य

मा. ना. श्री. इंद्रनील नाईक

राज्यमंत्री, उद्योग, सार्वजनिक बांधकाम(सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण,महाराष्ट्र राज्य

. श्री. कृपाल तुमाने, विधानपरिषद सदस्य

श्री. श्रावण हर्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, महा-मेट्रो

श्री. अभिजित चौधरी, आयुक्त, नागपूर महानगरपालिका

श्री. अनिल कोकाटे,संचालक - महा मेट्रो

श्री. राजीव त्यागी, संचालक - महा मेट्रो

प्रामुख्याने उपस्थित होते.

